# चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
## कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर


Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

०३ जुन, २०१९

☎ : 07172-264300
: 07172-255800
: 7276494810 (PRO)


# चंद्रपुर पोलीसांव्दारे सोन्या चांदीचे दागीने, दुचाकी वाहने व मोबाईलसह ७३ लक्ष रूपयाचा मुद्देमाल फिर्यादींना परत.

आज दिनांक ०९/०६/२०१९ रोजी चंद्रपूर जिल्हा पोलीस दलाच्या वतीने पोलीस मुख्यालय चंद्रपुर येथे आयोजित मुद्देमाल वितरण समारंभा मध्ये सोन्या चांदीचे दागीने, वाहने व मोबाईलसह एकुण ७३ लक्ष ८५३ रू. च्या मुद्देमालाचे वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

चंद्रपुर जिल्हयातिल विविध पोलीस स्टेशन येथे दाखल चोरी व घरफोडी सारख्या गुन्हयातिल तसेच नागरीकांचे हरविलेले मोबाईल परत करण्या करीता मा. ना. सुधिर मुनगंटीवार, मंत्री वित्त, नियोजन व वने तथा पालकमंत्री जिल्हा चंद्रपुर यांच्या अध्यक्षतेखाली तसेच जिल्हाधिकारी श्री. कुणाल खेमणार व पोलीस अधिक्षक श्री. महेश्वर रेड्डी यांचे प्रमुख उपस्थितीत मुद्देमाल वितरण समारंभ आयोजित करण्यात आला होता. सदर कार्यक्रमामध्ये एकुण ५९ गुन्हयातिल तपासा दरम्यान हस्तगत करण्यात आलेला मुद्देमाल ज्यामध्ये एकुण ३८ दुचाकी वाहने, सोन्या—चांदीचे दागीने, रोख रक्कम व एकुण हरविलेल्या मोबाईलपैकी हस्तगत केलेले २०० मोबाईल असा एकुण ७३ लक्ष ८५३ रू. चा मुद्देमालाचे वाटप संबंधीत गुन्हयातिल फिर्यादी यांना करण्यात आले.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी असलेले माननिय पालकमंत्री महोदय यांनी आपले अध्यक्षीय भाषणात पोलीसांनी आयोजित केलेल्या या अभिनव उपक्रमाचे कौतुक करताना म्हणाले की, सदरचा कार्यक्रम हा पारदर्शकता, पोलीस आणि जनता यामध्ये विश्वास निर्माण करण्याकरीता उचलेले एक मोठे पाउल आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पोलीस अधिक्षक चंद्रपुर श्री. महेश्वर रेड्डी यांनी करून त्यामध्ये चंद्रपुर पोलीस दल करीत असलेल्या कामगिरी बाबत माहिती दिली. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन व आभार प्रदर्शन उपविभागिय पोलीस अधिकारी श्री. शिलवंत नांदेडकर यांनी केले. सदर कार्यक्रमास संबंधीत गुन्हयातिल तक्रारदार तसेच पोलीस अधिकारी व कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते.

———————————————————————————————